21/8/2018

Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur,Dist.Osmanabad

# Munshi Premchanda Jayanti News

संघर्ष

01/08/2018

## साहित्यसम्राट मुंशि प्रेमचंद हे कालजयी साहित्यकार –प्रा.डॉ .डी.वाय इंगळे यांचे प्रतिपादन



उस्मानाबाद दि. ३१ (प्रतिनिधी) – भारतीय साहित्य विश्वामध्ये हिंदी भाषेचे साहित्यकार ऊपन्यास सम्राट प्रेमचंद यांचे स्थान सर्वोतपरी मानले जाते,कारण भारतीय समाजाला काल्पनिक आणि मनोरंजनाच्या विश्वातुन सत्याकडे घेऊन जाणारे साहित्य प्रेमचंद यांनी निर्माण केले ,आणि म्हणुनच त्यांना कालजयी भारतीय साहित्यकार म्हणुन ओळखले जाते. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथे हिंदी विभागाच्या वतिने शिक्षणमहर्षी डॉ .बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधुन ऊपन्यास सम्राट मुंशि प्रेमचंद जयंती मोठ्या ऊत्साहात संपन्न झाली याप्रसंगी प्रमुख वक्ते प्रा.डॉ .डी.वाय.इंगळे,हिंदी विभागप्रमुख रामकृष्ण परमहंस महाविद्यालय ऊस्मानाबाद तथा अध्यक्ष हिंदी अभ्यास मंडळ डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांनी वरील प्रतिपादन केले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात ते पुढे म्हणाले की,प्रेमचंद यांचे जिवन संघर्षशिल संस्काराचे होते,भारतीय शेतकरी जिवनाचा संघर्षमयी प्रवास त्यांनी अनुभवला होता ,म्हणुनच गोदान,रंगभूमि,कर्मभूमि आदि ऊपन्यांसामधुन त्यांनी हदयस्पर्शी शेतकरी बांधवांच्या व्यथा मांडल्या.समाजाच्या प्रत्येक सूक्ष्म समस्यांकडे त्यांनी लक्ष दिले,त्यांच्या साहित्यातील पात्रांचे वैशिष्ट्ये हे आहे की ते कधीही परिस्थितीमुळे निराश होत नाहीत आणि म्हणुनच या पात्रांचा अभ्यास करण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली.महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ .एस.बी.शेतसंदी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.या प्रसंगी विद्यार्थ्यां करवी निर्माण केलेल्या प्रेमचंद विशेषांक तुतारीभित्तिपत्रिकेचे प्रकाशनही प्र.प्राचार्य व प्रमुख वक्त्यांच्या हस्ते करण्यात आले.सदर कार्यक्रमासाठी प्रा.हनमंतराव साळुंखे ,प्रा. डॉ .टि.एल.बारबोले,प्रा.डॉ .शिवाजीराव देशमुख,प्रा.डॉ .मेजर.वाय.ए.डोके,प्रा.जी.व्ही बाविस्कर,प्रा.डॉ .सी.आर. दापके,प्रा.डॉ ,फर्जाना तांबोळी यांचे सहकार्य लाभले,या प्रसंगी आलोक शिंदे ,सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी विद्यार्थिनि यांची ऊपस्थिती होती,कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ .आडे एम,आर यांनी तर आभार प्रा.व्ही.एच.चव्हाण यांनी मानले. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ .एस.बी.शेतसंदी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

1/8/2018

1/8/2018

Principal

Tuljabhavani Mahavidyalay

Tuljapur.Dist Osmanabad

एकमत

01/08/2018

## प्रेमचंद हे कालजयी साहित्यकार : प्रा. इंगळे



शहर प्रतिनिधी

तुळजापूर : भारतीय साहित्य विश्वामध्ये हिंदी भाषेचे साहित्यकार उपन्यास सम्राट मुन्शी प्रेमचंद यांचे स्थान सर्वोतपरी मानले जाते, कारण भारतीय समाजाला काल्पनिक आणि मनोरंजनाच्या विश्वातून सत्याकडे घेऊन जाणारे साहित्य प्रेमचंद यांनी निर्माण केले. यामुळे त्यांना कालजयी भारतीय साहित्यकार म्हणून ओळखले जाते, असे मत विद्यापीठाच्या हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. डी. वाय. इंगळे यांनी व्यक्त केले.

तुळजाभवानी महाविद्यालय हिंदी विभागाच्या वतीने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून मुन्शी प्रेमचंद जयंती मोठ्या उत्साहात झाली. याप्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. डी. वाय. इंगळे हे बोलत होते.

प्राचार्य डॉ. एस. बी. शेतसंदी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्यावतीने निर्माण केलेल्या प्रेमचंद विशेषांक या तुतारी भितिपत्रिकेचे प्रकाशन प्राचार्य व प्रमुख वक्त्यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रा. हनमंतराव साळुंखे, प्रा. डॉ. टी. एल. बारबोले, प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख, प्रा. डॉ. मेजर वाय. ए. डोके, प्रा. जी. व्ही. बावीस्कर, प्रा. डॉ. सी.आर. दापके, प्रा. डॉ. फर्जाना तांबोळी यांचे सहकार्य लाभले. या प्रसंगी आलोक शिंदे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

सूत्रसंचलन प्रा. डॉ. एम. आर. आडे यांनी केले, तर आभार प्रा. व्ही. एच. चव्हाण यांनी मानले.

Celebration of Earnest Hemingway Jayanti News

दैनिक दिव्य मराठी 27/07/2018

# हेमिंग्वे यांच्या जन्मदिनानिमित्त भित्तीपत्रिकेचे प्रकाशन



प्रतिनिधी । तुळजापूर

तुळजाभवानी महाविद्यालयात इंग्रजी विभागाच्या वतीने अर्नेस्ट हेमिंग्वे या २० व्या शतकातील लेखकाच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या जीवनावर आधारित तुतारी भित्तीपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्रा. प्राचार्य डॉ. एस. बी. शेतसंदी, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. मेजर वाय. ए. डोके यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. फर्जाना तांबोळी यांनी मानले. इंग्रजी भाषेचे साहित्यिक हेमिंग्वे हे अत्यंत प्रतिभावंत कांदबरीकार, लघुकथाकार व अतिशय निर्भिड असे पत्रकार होते. त्यांच्या आइसबर्ग थेअरिचा समकालीन जनसामान्यांवर विशेष प्रभाव दिसून येतो.

१९२० ते १९५० या काळात त्यांनी साहित्य सृजन केले, त्यांच्या लिखाणासाठी त्यांना १९५४ साली साहित्यजगताचा मानाचा नोबेल पुरस्कार प्राप्त झाला होता.

27/7/2018

Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad

Celebration of Swatantryavir Vinayak Damodar Savarkar Jayanti News

दै. संघर्ष. दि. 30/5/2018

दैनिक संघर्ष समाजवादाचा

30-5-2018

# तुळजाभवानी महाविद्यालयात सावरकर जयंती उत्साहात



तुळजापूर, दि.२९/प्रतिनिधी

येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती मोठ्या ऊत्साहात संपन्न झाली,याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ .एस.बी.शेतसंदी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले,तसेच प्रा.आशपाक आतार यांनी आपले मनोगत व्यक्त केले ,ते म्हणाले की वि.दा.सावरकरांवर मातृभाषा मराठीचा खुप प्रभाव होता,लहानपणापासूनच ते अत्यंत बुद्धिमान होते,वक्तृत्व ,काव्यरचना ह्यांवर त्यांचे प्रभुत्व होते,लंडनमधील इंडिया हाऊसमध्ये राहात असताना सावरकरांनी जोसेफ मझिनीच्या आत्मचरित्राचे मराठी भाषांतर केले,अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर या अजरामर रचनेचे ते निर्माता होय.आजच्या तरुणांनी सावरकरांच्या साहित्याचा अभ्यास करण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.विवेकानंद चव्हाण यांनी केले ,या प्रसंगी कार्यालयीन अधिक्षक एस.पी.दरगुडे तसेच इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी ऊपस्थित होते तर कार्यक्रमाचे आभार लेखाधिकारी सुमेर कांबळे यांनी मानले.

Celebration of Annabhau Sathe Jayanti News

दैनिक संघर्ष

दि. 03/08/2017.

TULJABHAVANI MAHAVIDYALAYA TULJAPUR

# आण्णाभाऊंचे साहित्य म्हणजे वर्गविग्रहाचे तत्वज्ञान

## जेष्ठ साहित्यकार डॉ. शिवाजीराव देशमुख यांचे प्रतिपादन



तुळजापूर, दि.१/प्रतिनिधी

आपल्या लेखणीच्या माध्यमातून ज्यांनी साम्यवादाचा पुरस्कार करुन विज्ञानवादाच्या जोरावर असे ठामपणे समाजास सांगितले की, ही पृथ्वी वास्तवात श्रमिकांच्या शेतकऱ्यांच्या तळहातावर आधारली आहे. पण या सामाजिक स्तरांचे भान ज्यांनी ज्यावेळी आपल्या साहित्यातून मांडले त्याच वेळी त्यांच्या साम्यवादाचे दर्शनही समाजास घउले. आपल्या साहित्यातून त्यांनी वर्गविग्रहाचे तत्वज्ञान मांडले, असे प्रतिपादन ज्येष्ठ सहित्यकार तथा मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजीराव देशमुख यांनी केले.

येथील तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथे आण्णाभाऊ साठेंची ९७ वी जयंती साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमाप्रसंगी डॉ. शिवाजीराव देशमुख आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की, आण्णाभाऊंना साहित्य विश्वात अनोखी प्रतिभा प्राप्त होती. ग्रामीण मातीतील बोली आणि कलांचा संस्कार घेऊन आलेला सिध्दहस्त कादंबरीकार, लोकनाट्यकार अशी शाहीर आण्णाभाऊंची प्रतिमा होती. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतून निर्माण झालेल्या मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याच्या नवनिर्मितीत लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे मोलाचे योगदान होते. त्यांनी ३५ कादंबऱ्या, ७ पटकथा, १३ नाटके, १६ वग, २२ कथासंग्रह असा अथांग साहित्य सागर निर्माण केला. आधुनिक काळातील साहित्यकारांना आण्णाभाऊंचे साहित्य नक्कीच दिशादर्शक आहे, असे अनमोल विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच सी. एस. पाटील, गुंड बी.डब्ल्यू. डॉ. डोके वाय.ए., धनंजय लोंढे, आशपाक अत्तार, व्ही. एच. चव्हाण, नगरे बी.के., ग्रंथपाल निकाळजे, एन.बी. काळे आदींचे कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थितीत होते.

Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur,Dist.Osmanabad

# Celebration of Shivjayanti News

संघर्ष

दि. 21/02/2018

## तुळजाभवानी महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात



तुळजापूर, दि.२०/प्रतिनिधी

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,कोल्हापूर संचलित तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथे मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रा. धनंजय लोंढे यांच्या हस्ते प्रतिमा पुजन करण्यात आले. तसेच याप्रसंगी सतिश वडगांवकर, आशपाक आतार, भोंडे, आडे, कु. लोखंडे, सालुंके, डॉ. एफ. एम. तांबोळी, नेताजी काळे, दीपक निकाळजे, आदी प्राध्यापकवृंद उपस्थित होते.सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. तसेच सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur,Dist.Osmanabad

# Celebration of University Foundation Day News

दिव्यमराठी दि. 25/08/2018

## मराठवाडा विद्यापीठ हे शिक्षण, संस्काराचे प्रमुख महाकें

**प्रा. डॉ. बालाजी गुंड यांचे मत**

प्रतिनिधी । तुळजापूर

मराठवाड्यातील शैक्षणिक बाजू भक्कम करण्यासाठीं डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाची महत्त्वाची भूमिका आहे. विद्यापीठाने महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण देशाला आपली ज्ञानरत्ने प्रदान केली आहेत. आजमितीला विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात ४०० महाविद्यालयांच्या माध्यमातून तीन लाख ५० हजार विद्यार्थी ज्ञानग्रहण करत आहेत, असे गौरवोद्गार ज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. बालाजी गुंड यांनी काढले.

तुळजाभवानी महाविद्यालयात गुरुवारी (दि.२३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रा. गुंड बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्रा. प्राचार्य डॉ. एस. बी. शेतसंदी, सुयोग आमृतराव, डॉ. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. गुंड यांनी विद्यापीठाचा इतिहास सांगताना २३ ऑगस्ट १९५८ रोजी आपल्या विद्यापीठाची स्थापना झाल्याचे सांगितले. तसेच विद्यापीठाच्या सुसज्ज अशा ग्रंथालयाच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी आपले भवितव्य निश्चित करत आहेत. डॉ. शिवाजीराव भोसले, डॉ. पांढरीपांडे, डॉ. नागनाथ कोतापल्ले आदी कुलगुरुंनी एक वेगळी दिशा या संस्कारांच्या महाकेंद्राला दिली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या विद्यापीठावर निष्ठा ठेऊन ज्ञानग्रहण करावे, असे मौलिक विचार गुंड यांनी यावेळी व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. आशपाक आतार यांनी तर आभार प्रा.जी. व्ही. बाविस्कर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. हनुमंतराव साळुंखे, प्रा. सतीश वडगांवकर, प्रा. डॉ. मेजर वाय. ए. डोके, प्रा. शिवाजीराव देशमुख, प्रा. टी. एल. बारबोले यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आदींची यावेळी मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.



तुळजाभवानी महिविद्यालयात विद्यापीठ वर्धापनदिन साजरा झाला.

25/8/2018

**Principal**
**Tuljabhavani Mahavidyalaya**
**Tuljapur, Dist. Osmanabad**

पुण्यनगरी दि. 25/08/18

## तुळजाभवानी महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापन दिन साजरा



**पुण्य नगरी** । वृत्तसेवा

**तुळजापूर** : येथील तुळजाभवानी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्र.प्राचार्य डॉ. एस. बी. शेतसंदी यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रा.डॉ. बालाजी गुंड उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. सुयोग अमृतराव, डॉ. शिंदे, प्रा. हनमंतराव साळुंखे, प्रा. सतिश वडगांवकर, डॉ. वाय. ए. डोके, शिवाजीराव देशमुख, टी. एल. बारबोले, आशपाक आतार, जी. व्ही. बाविस्कर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. पो पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी बांधकाम विभागाचे अभियंता इकबाल ज शेख (वय ५१) हे मंगळवारी कार लातूरकडे निघाले होते. दरम्यान, व आगाराच्या लातूर-बार्शी बसने (क्र. एम ०७-सी ७४४६) कारला जोराची धडक ि या अपघातात शेख हे जबर जखमी होऊन झाले. याप्रकरणी इरफान टाके (रा. लात यांच्या फिर्यादीवरून बस चालकाविरुद्ध गुन्हा झाला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पो वाहेद मुल्ला हे करीत आहेत.

# Celebration of NSS Day News

दैनिक
**समय सारथी**

## राष्ट्रीय सेवा योजनेमुळे सेवा संस्कार वाढीस लागतात—प्रा.नेताजी काळे

**तुळजापूर – समय सारथी**

येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथे राष्ट्रीय सेवा योजना दिवस मोठ्या ऊत्साहात संपन्न झाला .या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.नेताजी काळे यांनी वरील ऊदगार काढले. आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात ते म्हणाले की देशातील युवकांमध्ये आर्थिक ,सामाजिक ,सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडविण्यासाठी सदर ऊपक्रमाची मोठी भूमिका आहे.२४सप्टेंबर १९६९ रोजी महात्मा गांधीच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाविद्यालयीन स्तरावर व्यापक स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना ऊपक्रम राबविला गेला.या निमित्ताने जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग या ऊपक्रमात नोंदवावा असे अवाहन त्यांनी या वेळी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी




प्रा.डॉ .टि.एल.बारबोले ,प्रा.डॉ .एम.आर.आडे,प्रा.डॉ .सी.आर. दापके , प्रा.एच.वाय.साळुंखे यांचे अनमोल सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सर्व एन.एस.एस.स्वंयसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

दैनिक
**दिव्य मराठी**

सोलापूर. मंगळवार. २५ सप्टेंबर २०१८ | १२

## 'तुळजाभवानी'मध्ये एनएसएस दिन साजरा

**प्रतिनिधी** | तुळजापूर

येथील तुळजाभवानी महाविद्यालयात सोमवारी (दि. २४) राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त कार्यक्रमात मार्गदर्शन करताना कार्यक्रमाधिकारी प्रा. नेताजी काळे यांनी युवकांमध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडविण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचा मोठा हातभार असून राष्ट्रीय सेवा योजनेमुळे युवकांमध्ये सेवा संस्कार वाढीस लागत असल्याचे प्रतिपादन केले.

यावेळी डॉ. टी. एल. बारबोले, डॉ. एम. आर. आडे, डॉ.सी. आर. दापके, प्रा. एच. वाय. साळुंखे आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना प्रा. काळे म्हणाले दि. २४ सप्टेंबर १९६९ रोजी महात्मा गांधीच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम व्यापक स्तरावर राबविला गेला. या निमित्ताने यंदाही विविध कार्यक्रम आयोजित केले असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग या उपक्रमात नोंदवावा, असे अवाहन केले.




तुळजाभवानी महाविद्यालयात एनएसएस दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur,Dist.Osmanabad

# Poster Presention at English Day News

दिव्यमराठी दि. २९/११/२०१८

२



तुळजाभवानी महाविद्यालयात उपक्रमासाठी विद्यार्थी, प्राध्यापक एकत्र आले.

## साहित्यावर पोस्टर प्रदर्शन घेऊन इंग्रजी दिवस साजरा

**प्रतिनिधी** | तुळजापूर

तुळजाभवानी महाविद्यालयात इंग्रजी साहित्यावर आधारित पोस्टर प्रदर्शन आयोजित करून इंग्रजी दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा. डॉ. मेजर वाय. ए. डोके, प्रा. डॉ. टी. एल. बारबोले, प्रा. मारुती लोंढे, प्रा. डॉ. एम. आर. आडे, ग्रंथपाल दीपक निकाळजे, प्रा. गोकुळ बाविस्कर, प्रा. डॉ . बालाजी गुंड, प्रा. आबासाहेब गायकवाड, प्रा. डॉ. एफ. एम. तांबोळी आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. मेजर वाय. ए. डोके यांनी तर आभार गितांजली गायकवाड हिने मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा भरभरुण प्रतिसाद लाभला.

**विविधांगी माहितीचे संकलनः** भारतीय व ब्रिटिश लेखक, बुकर पुरस्कारप्राप्त लेखक, इंग्रजी उच्चार शास्त्रावर आधारित शब्द संकलन, प्रतिलेखन, समनामाचे प्रकार, पूर्व प्रत्ययकारी शब्द, पुलित्झर पुरस्कार प्राप्त भारतीय व ब्रिटिश लेखक, भारतीय व ब्रिटिश साहित्य अकादमी प्राप्त लेखक, थोर सामाजिक संत मदर तेरेसा, अर्थतज्ज्ञ डॉ. अमर्त्य सेन, रामानुजन अशा थोर विचारवंतांच्या, साहित्यिकांच्या विविधांगी माहितीचे संकलन करून पोस्टर प्रदर्शन तयार करण्यात आले.

प्राचार्य
तुळजाभवानी महाविद्यालय,
तुळजापूर जि.उस्मानाबाद

# Celebration of Vivekanand Jayand & Rajmata Jijau Jayanti News

आ. स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जयंती प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, प्राध्यापकवृंद विद्यार्थी - विद्यार्थिनी. ३८१




लाल बहादूर शास्त्री जयंती व महात्मा गांधी जयंती निमित्त प्रतिमा पुजन करताना मा. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, सर्व प्राध्यापकवृंद, विद्यार्थी विद्यार्थिनी.




Coordinator IQAC
Tuljabhavani Mahavidyalaya
Tuljapur, Dist. Osmanabad

प्राचार्य
तुळजाभवानी महाविद्यालय,
तुळजापूर जि. उस्मानाबाद

# Celebration of Mahatma Gandhi & Lal Bahaddur Shastri Jayanti News

दैनिक दिव्य मराठी

4/10/2018

## थोर विभूतींचे वैचारिक अधिष्ठान अभ्यासण्याची गरज

### तुळजाभवानी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांचे आवाहन

**प्रतिनिधी | तुळजापूर**




अहिंसक मार्गाने, असहकार आंदोलनांनी भारताला त्यांनी स्वातंत्र्य मिळवून दिले. गांधीजी हे सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक होते. ते राष्ट्रशिक्षकांच्या भूमिकेत सुधारणावादी होते, अशा थोर विभूतींचे वैचारिक अधिष्ठान अभ्यासण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.एस.एम.मणेर यांनी केले.

तुळजाभवानी महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. मणेर बोलत होते. पुढे बोलतांना प्राचार्य मणेर म्हणाले की, महात्मा गांधी हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते आणि महान तत्वज्ञ होते. तर देशाचे द्वितीय पंतप्रधान हे सच्चे गांधीवादी होते. त्यांनी सतत जातिपातिचा विरोध केला, विद्यार्थी दशेत त्यांना अभ्यासातील आडथळे कधीही सहन झाले नाहीत, त्यांचे व्यक्तिमत्त्व हे हिमालयासारखे ऊत्तुग असेच होते. आज विद्यार्थ्यांनी या महान विभुतींचा विचारांचा देशहीत व राष्ट्रहितासाठी संशोधनात्मक पध्दतीने अभ्यास करण्याची गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमासाठी प्रा. धनंजय लोंढे, प्रा. नेताजी काळे, ग्रंथपाल दीपक निकालजे, प्रा. डॉ. एफ. एम. तांबोळी, प्रा. डॉ. एम. आर. आडे, प्रा.मारुती लोंढे, प्रा. विवेकानंद चव्हाण, प्रा. सतीश वडगावकर आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. आशपाक आतार यांनी तर आभार प्रा. आबासाहेब गायकवाड यांनी मानले.

### तुतारी भित्तीपत्रिकेचे प्रकाशन

महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून राज्यशास्त्र विभागातर्फे संयुक्त महाराष्ट्र चळवळ या विषयावर आधारित प्रा.डॉ.बी.डब्ल्यू.गुंड यांच्या पुढाकाराने विशेष तुतारी भित्तीपत्रीकेचे प्रकाशन करण्यात आले. भित्तीपत्रिकेसाठी सपना बनपट्टे, पल्लवी विटकर, संध्या क्षीरसागर, कोमल रोडे, कोमल देव्हारे, श्वेता रोहिले या विद्यार्थिनींनी पुढाकार घेतला.

Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur,Dist.Osmanabad

# Celebration of Marathwada Mukti Sangram Day News

पान ६ जनमत सर्वसामान्यांचे दिनांक १८ सप्टेंबर २०१८

उस्मानाबाद ग्रामीण

(1)

## तुळजाभवानी महाविद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा



तुळजापूर, दि. १७ (प्रतिनिधी) येथील श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथे सोमवार (दि.१७) रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .एस.एम. मणेर यांच्या हस्ते मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्याचे प्रणेते स्वामी रामानंद तिर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्ष व मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधुन या प्रसंगी ग्रंथालय विभागातर्फे व प्रा.दिपक निकाळजे यांच्या पुढाकाराने दुर्मिळ व ऐतहासिक ग्रथाच प्रदशन आयोजित करण्यात आले होते. या वेळी प्रा.जयसिंगराव देशमुख ,कांटी तथा रसायनशास्त्र माजी विभागप्रमुख विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांनी स्वामी रामानंद तिर्थ यांची प्रतिमा भेट म्हणुन दिली. या प्रसंगी मुख्याध्यापक वागदकर, प्राचार्य दोंड, प्रा.सतिश वडगावकर, प्रा.डा .मजर वाय. ए.डोके, प्रा.धनंजय लोंढे, यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.आशपाक आतार यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एम. मणेर यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

(2)

दैनिक संघर्ष समाजवादाचा 14/9/2018

## तुळजाभवानी महाविद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन ऊत्साहात साजरा

तुळजापूर ,दि.१४,येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन मोठ्या ऊत्साहात संपन्न झाला.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .एस.एम.मणेर यांच्या हस्ते मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्याचे प्रणेते स्वामी रामानंद तिर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.शिक्षणमहर्षी डॉ .बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्ष व मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधुन या प्रसंगी ग्रंथालय विभागातर्फे व प्रा.दिपक निकाळजे यांच्या पुढाकाराने दुर्मिळ व ऐतिहासिक ग्रंथाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.या वेळी प्रा.जयसिंगराव देशमुख ,काटी तथा रसायनशास्त्र माजी विभागप्रमुख विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांनी स्वामी रामानंद तिर्थ यांची प्रतिमा भेट म्हणुन दिली.या प्रसंगी मुख्याध्यापक वागदकर,प्राचार्य दोंड,प्रा.सतिश वडगांवकर,प्रा.डॉ .मेजर वाय.ए.डोके,प्रा.धनंजय लोंढे यांची प्रमुख ऊपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.आशपाक आतार यांनी केले.याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या प्रमाणात ऊपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .एस.एम.मणेर यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur,Dist.Osmanabad

# Celebration of Dr. A.P.J. Kalam Jayanti News

जनमत दि. 17/10/2018

## तुळजाभवानी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन मोठया उत्साहात साजरा

तुळजापूर दि.१६ (प्रतिनिधी)- श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथे भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमीत्त दि. रोजी वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जिवन चरित्रावर आधारित तुतारी भित्तीपत्रिका विशेषांकाचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एम.मणेर यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. याप्रसंगी प्रा.डॉ.शिवाजीराव देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले, ते म्हणाले की, महात्मा गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरु, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महान व्यक्तित्वांची व्यक्तीत्व हे ग्रंथामुळेच निर्माण झाली. ग्रंथामुळे व्यक्तीच्या बुद्धीला पंख फुटुन मन विशाल होत असते. नव्या ज्ञानाचा शोध घेण्याची वृत्ती जोपसणे आवश्यक आहे.

पुस्तक माणसाचे मस्तक समृद्ध करंते, समृद्ध मस्तक कोणाचेही हस्तक होत नाही. ज्ञानावरच राष्ट्रांची समाजाची उंची निश्चित होत असते, असा अनमोल संदेश त्यांनी यावेळी



दिला. कार्यक्रमासाठी प्रा.डॉ. सी.आर.दापके, प्रा.डॉ.एफ.एम. तांबोळी, प्रा.सतीश वडगावकर प्रा.आबासाहेब गायकवाड, प्रा.सिध्देश्वर सुरवसे, यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थींनी, सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सदर प्रसंगी ग्रंथपाल दिपक निकाळजे यांनी सूत्रसंचलन, तर प्रा.आशपाक आतार यांनी आभार मानले. सदर कार्यक्रम प्राचार्य डॉ.एस.एम.मणेर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

दिव्य-मराठी दि. 18/10/2018

## कलाम यांच्यावरील भित्तीपत्रिकेचे प्रकाशन

प्रतिनिधी | तुळजापूर

तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जिवन चरित्रावर आधारित तुतारी भित्तीपत्रिका विशेषांकाचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख, प्रा. डॉ. सी. आर. दापके, प्रा. डॉ. एफ. एम. तांबोळी, प्रा. सतीश वडगावकर, प्रा. आबासाहेब गायकवाड, प्रा. सिध्देश्वर सुरवसे आदींसह महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ग्रंथपाल दीपक निकाळजे यांनी तर आभार प्रा. आशपाक आतार यांनी मानले.



तुळजापूर येथील तुळजाभवानी महाविद्यालयात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनचरित्रावरील तुतारी या भित्तीपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.

Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad



वाचन प्रेरणा दिननिमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन

# Celebration of Swami Vivekanand Jayanti & Rajamata Jijau Jayanti



तुळजाभवानी महाविद्यालयात विवेकानंद सप्ताह साजरा



# Celebration of Marathwada Mukti Sangram Din



## मराठवाडा मुक्तिसंग्राम लढा सर्वसामान्य जनतेचा होता

## मराठवाडा मुक्तिसंग्राम व्याख्यान बुबासाहेब जाधव यांचे प्रतिपादन

**तुळजापूर – समय सारथी**

येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथे महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे आणि मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हैदराबाद मुक्तिसंग्राम : गाथा आणि संघर्ष या विषयावर आधारित बुबासाहेब जाधव, जेष्ठ विचारवंत चिलवडी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी त्यांनी वरील प्रतिपादन केले.आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात बोलताना ते पुढे म्हणाले की मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा लढा हा कोणत्याही जाती किंवा धर्माविरुद्ध नव्हता. तो लढा एका अन्यायकारी प्रशासनाविरुद्ध होता. निजामशाही ही भारताच्या मध्यभागी होती, आणि निजामाला बरोबर भारताच्या मध्यभागात आपल्या धर्मावर आधारित एक नवीन राज्य स्थापीत करावयाचे होते. आपल्यातीलच कांहीं लोक लाचार झाले होते. आपला पराभव लाचार लोकांमुळेच झाला होता. निजामाच्या संस्थानात १३८ शहरे होती. त्यांची कार्यालयीन भाषा ही उर्दू होती. औरंगजेबानंतर मोगलशाही खिळखिळी झाली होती. कमरुद्दिन नावाचा प्रथम निजाम होता तर मिर उस्मान अली शेवटचा निजाम ठरला. १३ सप्टेंबर १९४८ रोजी रात्री १:३०. वाजता भारत सरकारच्या आदेशानुसार मोहीम सुरू झाली होती तब्बल १०९ तासांच्या लष्करी कारवाई नंतर निजाम शरण आला होता. आज तरुण पिढिने हा मुक्तिसंग्रामाचा लढा अभ्यासण्याची गरज यावेळी त्यांनी व्यक्त केली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस एम मणेर अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, आधुनिक काळातील पिढीला हैदराबाद मुक्तिसंग्राम बाबत माहिती असणे गरजेचे आहे. हा लढा सामाजिक ऐक्याची भावना वाढवणारा लढा होता. ही बाब समजून घेण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. सदर प्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते तसेच प्रशासकीय निर्देशानुसार प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमा प्रसंगी तुळजाभवानी अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य दौंड तसेच शिंदे हायस्कूलचे मुख्याध्यापक वागतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा डॉ एस एम देशमुख, प्रा धनंजय लोंढे, प्रा.ए.बी वसेकर, प्रा विवेक कोरे, प्रा डॉ विलास गुंड पाटील यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.जे बी क्षीरसागर यांनी तर आभार प्रा व्ही एच चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाप्रसंगी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व योग्य ती खबरदारी घेऊन हा कार्यक्रम घेण्यात आला.